# अहवाल

नमस्कार

'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' या आपल्या संस्थेच्या ब्रीदवाक्याला अनुसरूनच आपल्या संस्थेच्या सुभेदार वाडा शाळेचा अहवाल सादर करताना आम्हाला अभिमान वाटत आहे की, अचानक उद्भवलेल्या जागतिक संकटात सुद्धा आपल्या शाळेने हाती घेतलेले ज्ञानदानाचे पवित्र कार्य ऑनलाइन पद्धतीने ही पूर्णत्वाला नेले आहे. ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच शिवधनुष्य शाळेने उचललं आणि समर्थपणे पेललही. त्यासाठी शिक्षकवर्गाला मे २०२० मध्ये प्रशिक्षणाद्वारे तयार केले गेले. हे सर्व सहज शक्य झालं ते संस्थेची दूरदृष्टी व अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहन व सहकार्यामुळे ! १८ जून २०२० ऑनलाइन शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. अनेक तांत्रिक अडचणींना आपली शाळा पुरून उरली .

शाळा म्हटलं की सण-समारंभ, उपक्रम सभा ह्या आल्याच . हे ऑनलाइन पद्धतीने करून आपल्या शाळेने covid-19 च्या पार्श्वभूमीवर शाळा बंद..... पण, शिक्षण चालू! या धर्तीवर सुभेदार वाडा विद्यासंकुलाने उल्लेखनीय कामगिरी पार पाडली. प्रत्येक महिन्याचे दिन वैशिष्ट्ये लक्षात घेऊन ऑनलाइन माध्यमातून सर्व साजरे केले .जसे की , १५ ऑगस्ट, चित्रकला स्पर्धा, राज्यस्तरीय अभिनय स्पर्धा,संस्था पातळीवरील अक्षीकर दिन , वाचन प्रेरणा दिन, संस्कृत कालिदास दिन, शाळेचा वर्धापन दिन ,प्रजासत्ताक दिन , मराठी राजभाषा दिन ,राष्ट्रीय विज्ञान दिन, ऑनलाईन विनामूल्य चित्रकला क्लासेस वर्ग, अप्पा बाहेकर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, पालक -शिक्षक सभा हे सर्व ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. शासकीय निर्णयानुसार परीक्षेची ऑनलाइन माध्यमातून नियोजन व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांचे प्रकल्प व उपक्रम हेदेखील याच पद्धतीने घेतले. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सराव चाचणी, प्रयोग, स्वाध्याय, प्रकल्प ऑनलाइन माध्यमातून घेण्यात आलेत. शाळेतील प्रत्येक घटकाला ऑनलाइन शिक्षण प्रणालीत यशस्वीपणे समाविष्ट करुन घेतले. विद्यार्थ्यांचा विकास साधला. या सर्व कार्याचे फलित म्हणजे इ. १०वी व १२वी चा १००% निकाल व नवीन विद्यार्थी प्रवेशाची वाढती संख्या आपल्या शाळेला मिळालेली पोचपावतीच म्हणावी लागेल.

तंत्रस्नेही पद्धतीने देखील शाळेचे शिक्षक व विद्यार्थी एकत्रित मिळून येणाऱ्या भावी काळात सुभेदारवाडा विद्यासंकुलाचे नाव नक्कीच उज्ज्वल करतील यात शंका नाही.......

धन्यवाद